MHOS090013782024

## निशाणी ४८ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्ज मंजुर करण्यास तीव्र विरोध केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, सदरचा दावा वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. तसेच, वादी हे सदर दाव्याच्या कामी काही महत्वाची कागदपत्रे हजर करत आहेत. सदर कागदपत्रे न्यायाच्या कारणास्तव दाखल करुन घेणे महत्वाचे असलेने न्यायास मदतच होणार आहे. सबब, वादींनी सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदरच्या अर्जावर आपले म्हणने देवुन सदरचा अर्ज नामंजुर करण्यांची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादी प्रतिवादीतर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादीने सदर दावा हा निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. दावा हा वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित आहे. वादी यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता सदर कागदपत्रे दाखल करुन

घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज (निशाणी ४८) मंजुर करण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

ठिकाण**:** कळंब **(**अमृता धोंडीराम जाधव**)**

दिनांक **:** ०७/०४/२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कळंब

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. P.S. Ovhal |
| Court | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Kallam |
| Date | 07/04/2026 |
| Order signed by the | |
| Presiding officer on | 07/04/2026 |
| Order uploaded on | 07/04/2026 |